Report (तक्रार क्र. 214)

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# महाराष्ट्र शासन

## अपर तहसिलदार व कार्यकारी दंडाधिकारी, मिरा-भाईदर यांचे कार्यालय

पत्रव्यवहाराचा पत्ता : प.पु.डॉ. केशव बळीराम हेगडेवार भवन इमारत, पहिला मजला, मॅक्सीस मॉलच्या मागे, अमृतवाणी रोड, भाईदर (प.), ४०११०१, ता. जि. ठाणे
दुरध्वी क्र. ०२२-२८१८५९१६ ईमेल आयडी-tahmirabhayander@gmail.com

क्र.महसूल/कांदळवन/कावि-३२७३/स्थळपाहणी क्र.७/२०२२ दिनांक :०५/०४/२०२३.

प्रति,

मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक,
कांदळवन कक्ष, मुंबई
पत्ता:- ३०२, वेक फिल्ड हाऊस, ३ रा मजला,
ब्रिटानिया रेस्टारंटजवळ, बॅलार्ड इस्टेट, फोर्ट मुंबई ४००००१

विषय :- To Register Immediate F.I.R. for the Mangrove destruction in Bhayander West bearing Survey Nos. 172, 201, 202, 203 & 204, 200 as per the joint visit conducted along with your office staff, forest officer, circle office & Talathi on dated 13/10/2022.

संदर्भ :- १)श्री. कृष्णा गुप्ता यांनी दि. ०७/१०/२०२२ रोजी ई-मेल द्वारे केलेली तक्रार.
२)तलाठी साझा, भाईदर यांचे कडील अहवाल जा. बा. नि. क्र.१६६/२०२२ दि.०७/१०/२०२२.
३)वन परिक्षेत्र अधिकारी, ठाणे यांचेकडील पत्र जा. क्र.ठा.कां. /जमीन/६९०/सन २०२२-२३ दि.२५/११/२२ प्राप्त दि.२०/१२/२२.
४) या कार्यालयाचे पत्र क्र.महसूल/कांदळवन/कावि-३२७३/स्थळपाहणी क्र. ७/२०२२ दि.०६/०२/२०२३.
५) उप अधीक्षक भूमी अभिलेख, ठाणे यांचेकडील पत्र क्र.महसूल/कांदळवन/अहवाल/२०२३/जा.क्र.३५ ठाणे दि.१३/०३/२०२३
६) भाईंदर पोलीस स्टेशन, भाईंदर येथे दाखल गुन्हा रजि. क्र.०१२९/२०२३ दि.१७/०३/२०२३.

उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई
आवक क्रमांक 624
दिनांक 06/4/2023
मुख्य लेखापाल ... उप वनसंरक्षक

Survey

महोदय,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने सादर करणेत येते, की तक्रारदार श्री. कृष्णा गुप्ता यांनी संदर्भ क्र. १ अन्वये मौजे भाईंदर येथील स.क्र.१६८, १६९, जुना स.क्र.६०४ न.स.क्र.१६३/६, १६३/७ या जागेवर अनधिकृत भरणी करुन कांदळवनाचा ऱ्हास केलेबाबत या कार्यालयास तक्रार दाखल केली होती.

सदर तक्रारीच्या तलाठी साझा, भाईंदर यांनी संदर्भ क्र. २ चे पत्रान्वये या कार्यालयास अहवाल सादर केलेला आहे.

उपरोक्त संदर्भ क्र. ३ चे पत्रान्वये वन परिक्षेत्र अधिकार, ठाणे यांनी या कार्यालयास कळविले आहे, की तक्रारीत नमुद ठिकाणाचे जी. पी. एस. लोकेशन गुगल अर्थवर सुपर इंमोज केले असता सदर ठिकाणी

MRSAC नुसार सन २००५

स.क्र.१७२, २०१, २०२, २०३, व २०४, २०० असे असल्याचे दिसून आले. सदर क्षेत्र अधिसूचित राखीव कांदळवन क्षेत्र नाही. सदर ठिकाणी MRSAC नुसार सन २००५ साली कांदळवन नाही. परंतु सद्यस्थितीत नमुद स.क्र. मध्ये मोठ्या प्रमाणात माती – डेब्रीजची भरणी केली असून, त्यामुळे कांदळवन झाडे त्याखाली दाबली गेली असल्याचे दिसून येत आहे. तसेच कांदळवन झाडे तोडल्याचे दिसून येत आहे व काही झाडे सुकलेली दिसून येत आहेत.

तक्रार अर्जात नमुद स्थळी मोठ्या प्रमाणात अनधिकृत भरणी करुन कांदळवनाचा ऱ्हास केलेची बाब प्राप्त अहवालानूसार दिसून येते असल्याने, उक्त संदर्भ क्र. ४ चे पत्रान्वये मौजे भाईंदर येथील उक्त नमुद सर्व्हे क्रमांकाच्या मिळकतीचे आजरोजी महसूल अभिलेखी बरेच पोटहिस्से दाखल आहेत. प्रकरणी पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ नूसार पूढील कार्यवाही करणेकामी अचुक सर्व्हे क्रमांक व पोट हिस्सा निश्चित होणे आवश्यक असल्याने, मौजे भाईंदर येथील प्रश्नाकिंत स्थळी अनधिकृत भरणी करुन कांदळवनाचा ऱ्हास झालेल्या ठिकाणाचे सर्व्हे क्रमांक व पोट हिस्से निश्चित करणेकामी गुरुवार दिनांक २३/०२/२०२३ रोजी सकाळी ठिक ११.३० वाजता संयुक्त स्थळपाहणी आयोजित करण्यात आली होती.

उपरोक्त संदर्भ क्र. ५ चे पत्रान्वये मा. उपअधीक्षक भूमी अभिलेख, ठाणे यांना दिनांक १३/०३/२०२३ रोजी या कार्यालयास खालील प्रमाणे अहवाल सादर केलेला असून, त्यामध्ये न.स.क्र.२०० हि. नं.१, स.क्र.२०१ हि.नं.९,११ स.क्र.२०२ हि.क्र.१,२ या जागेमध्ये माती डेब्रीजच्या भरणा दिसून येतो असे कळविणेत आले आहे.

उक्त वस्तुस्थिती विचारात घेता, उपरोक्त दिनांक २३/०२/२०२३ रोजीच्या संयुक्त स्थळपाहणी अहवालानूसार या कार्यालयाद्वारे भाईंदर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि. क्र. ०१२९/२०२३ नूसार पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ चे कलम १५ व १९ अन्वये संबंधीतांवर गुन्हा दाखल करणेत आलेला आहे. हे आपल्या माहितीसाठी सविनय सादर करणेत येत आहे.

(डॉ. नंदकिशोर देशमुख)
अपर तहसिलदार, मिरा-भाईंदर

महाराष्ट्र शासन
अपर तहसिलदार व कार्यकारी दंडाधिकारी, मिरा-भाईंदर यांचे कार्यालय
पत्रव्यवहाराचा पत्ता : प.पु.डॉ.केशव बळीराम हेगडेवार भवन इमारत, पहिला माळा, मॅक्सस मॉलच्या मागे, अमृतवाणी रोड, भाईंदर (प)- ४०११०१. तालुका-ठाणे, जिल्हा- ठाणे.
दुरध्वी क्र. ०२२-२८१८५९१६ ईमेल आयडी-tahmirabhayander@gmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्र.महसूल/कांदळवन/स्थळपाहणी क्र. ७/२०२२ दिनांक : ०५/०४/२०२३

प्रति,

मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक,
कांदळवन कक्ष, मुंबई

विषय :- To Register Immediate F.I.R. for the Mangrove destruction in Bhayander West bearing Survey Nos. 172, 201, 202, 203 & 204, 200 as per the joint visit conducted along with your office staff, forest officer, circle office & Talathi on dated 13/10/2022.
श्री. कृष्णा गुप्ता यांचा तक्रारी अर्ज.

महोदय,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने सादर करणेत येते, की मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी रिट याचिका क्रमांक ३२४६/२००४ मध्ये दिनांक ०६/१०/२००५ रोजी दिलेला निर्णय व त्यातील रुपांतरीत जनहित याचिका क्रमांक ८७/२००६ मध्ये दिनांक २७/०१/२०१० रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने श्री. कृष्णा गुप्ता यांनी कांदळवनाच्या / पाणथळाच्या -हासाबाबत दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सखोल चौकशी करुन, केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल पुढीलप्रमाणे सादर करीत आहोत.

**कांदळवन तक्रारीचा पुर्तता अहवाल**

| अ.क्र. | तक्रारीचा तपशील | कार्यवाहीचा तपशील |
|---|---|---|
| १ | तक्रारदाराचे नाव व दिनांक | श्री. कृष्णा गुप्ता |
| २ | तक्रारीचा विषय | भाईंदर पश्चिम येथे कांदळवनण नष्ट करुन तेथे बेकायदेशीरपणे भराव करणाऱ्या जागा मालक व विकासकांवर तातडीने गुन्हा नोंदविणेबाबत |
| ३ | तक्रारीशी संबंधीत जागेचा तपशील उदा. स.क्र. गावाचे नाव, तालुका | मौजे भाईंदर येथील न.स.क्र.२०० हि. नं.१, स.क्र.२०१ हि.नं.९,११ स.क्र.२०२ हि.क्र.१,२ |
| ४ | चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव व पदनाम | नायब तहसिलदार सौ. स्मिता गुरव, वन परिक्षेत्र अधिकारी, ठाणे, उप अधीक्षक भूमी अभिलेख, ठाणे, मंडळ अधिकारी, भाईंदर श्री. दिपक अहिरे, कांदळवन उपसमिती |
| ५ | चौकशीमध्ये आढळून आलेली वस्तुस्थिती | ➢ तक्रारीत नमुद ठिकाणाचे जी. पी. एस. लोकेशन गुगल अर्थवर सुपर इंमोज केले असता सदर ठिकाणी स.क्र.१७२, २०१, २०२, २०३, व २०४, २०० असे असल्याचे दिसून आले. सदर क्षेत्र अधिसूचित राखीव कांदळवन क्षेत्र नाही. सदर ठिकाणी |

| | | |
|---|---|---|
| | | MRSAC नुसार सन २००५ साली कांदळवन नाही. परंतु सद्यस्थितीत नमुद स.क्र. मध्ये मोठ्या प्रमाणात माती – डेब्रीजची भरणी केली असून, त्यामुळे कांदळवन झाडे त्याखाली दाबली गेली असल्याचे दिसून येत आहे. तसेच कांदळवन झाडे तोडल्याचे दिसून येत आहे व काही झाडे सुकलेली दिसून येत आहेत.<br>➢ न.स.क्र.२०० हि. नं.१, स.क्र.२०१ हि.नं.९,११ स.क्र.२०२ हि.क्र.१,२ या जागेमध्ये माती डेब्रीजच्या भरणा दिसून येतो. |
| ६ | कांदळवनाचा ऱ्हास झाला आहे किंवा नाही. | कांदळवनाचा ऱ्हास झाला आहे. |
| ७ | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास दाखल केलेला गुन्हा क्रमांक, दिनांक व संबंधीत पोलीस स्थानकांचे नाव | भाईदर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि. क्र. ०१२९/२०२३ नूसार पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ चे कलम १५ व १९ अन्वये संबंधीतांवर गुन्हा दाखल करणेत आलेला आहे |
| ८ | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास, ज्याच्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे त्या व्यक्तींची नावे व पत्ता | नाही. |
| ९ | कोणत्या कायद्याअंतर्गत/कलमाअंतर्गत गुन्हा दाखल केला त्यांचे वर्णन | नाही. |

सदर तक्रारीच्या अनुषंगाने वरील प्रमाणे कार्यवाही करण्यात आली असून, सोबत पंचनामा व एफ.आय.आर. च्या प्रतीसह पृष्ट क्रमांक १ ते --- सादर केलेली आहेत.

(डॉ. नंदकिशोर देशमुख)
अपर तहसिलदार, मिरा-भाईंदर

प्रत :- मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांना माहितीसाठी सविनय सादर.